ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार, १७ जुलै, १९६३ अंक १४

## विविध माहिती

**औषधी कारखान्याची यंत्रसामग्री**—रशियाच्या मदतीनें हैद्राबादजवळ काढण्यांत येत असलेल्या औषधांच्या कारखान्यासाठीं सुमारें १,५०० टन वजनाची यंत्रसामग्री लागणार आहे. किंमतीच्या दृष्टीनें विचार करतां ती ५ कोटी रुपयांची होईल. त्यांपैकीं १ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री रशियाकडून मिळालेली आहे. कारखाना १९६६ च्या प्रारंभीं बांधून पूर्ण होईल. तो चालविण्याचें शिक्षण घेण्यासाठी २५ इंजिनिअर्सना व तंत्रज्ञांना रशियांत पाठविण्यांत आलेलें आहे.

**राजकोटला यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—सौराष्ट्रामधील दोघां उद्योगपतींनीं राजकोट येथें यांत्रिक हत्यारांचा कारखाना उभारण्याची तयारी चालविली आहे. त्यासाठीं पश्चिम जर्मनींतील एका कारखान्याचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीसाठी ५० लाख रुपये भांडवलाची कंपनी काढण्यांत येणार आहे. सौराष्ट्रांत निघणारा यांत्रिक हत्यारांचा हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्यांत ३०० कामगारांना रोजगार मिळेल.

**कोळसाखाणींची यंत्रसामग्री**—कोळसाखाणींना लागणारी कांहीं विशेष प्रकारची यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना काढण्यासाठीं एका ब्रिटिश कंपनीनें मदत करण्याचें कबूल केलें आहे. राष्ट्रीय कोळसा विकासमंडळाच्या बंगालमधील कारखान्यांत ती बनविण्यांत येईल. हा नवा कारखाना दुर्गापूर येथील कोळसाखाणींची यंत्रसामग्री बनविणाऱ्या कारखान्याशिवाय आहे. दुर्गापूरच्या कारखान्याला रशियाची मदत आहे.

**कागदाच्या धंद्याचें तंत्रज्ञान**—कागद तयार करण्याच्या धंद्याचें तांत्रिक ज्ञान देणारी एक शिक्षणसंस्था उत्तर प्रदेशांत सहराणपूर येथें काढण्यांत येणार आहे. संस्था स्थापन करण्याचे कामीं स्वीडनच्या सरकारचें साह्य घेण्यांत येईल. संस्थेसाठीं सुमारें १५ लाख रुपये लागणार असून त्यांपैकीं परदेशी चलनांतील खर्च स्वीडन सोसणार आहे. रुपयांतील खर्च भारत सरकार व उत्तरप्रदेश सरकार करणार आहे.

**खाणींसाठीं लागणारी यंत्रसामग्री**—खाणींत वापरण्यांत येणारी कांहीं यंत्रसामग्री तयार करण्यासाठीं हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशननें ग्लासगो येथील एका कंपनीशीं करार केला आहे. नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या वर्कशॉपमध्यें ती बनविण्यांत येईल. यंत्रसामग्री बनविण्यास लागणारें सर्व तांत्रिक साह्य ग्लासगोची कंपनी देणार आहे. त्याशिवाय ग्लासगो येथील कंपनीच्या कारखान्यांत हिंदी तंत्रज्ञांना शिक्षणहि कंपनी देणार आहे.

**राजधानींतील भिकारी**—दिल्लींतील भिकाऱ्यांची संख्या ५ हजारांच्या घरांत असल्याचें पाहणींत आढळून आलें आहे. हे भिकारी सर्व वेळ हाच धंदा करणारे आहेत; परंतु जत्रा अगर धार्मिक उत्सवप्रसंगीं त्यांची संख्या १० हजारपर्यंत वाढते. अशा दिवशीं उत्तर प्रदेश, पंजाब, इत्यादि राज्यांतून हंगामी भिकारी राजधानींत गर्दी करतात आणि त्यांना प्राप्तीहि चांगली होते.

**शेतीविकासासाठीं मदत**—केरळ राज्यांतील एका शेतीच्या विकासाच्या कामाच्या प्राथमिक अवस्थेसाठीं स्वित्झरलंडचें सरकार १६ लाख, ४० हजार स्विस फ्रँक्सची मदत देणार आहे. विकासाचीं सर्व कामें पुरीं होण्यास १२ वर्षें लागणार आहेत. पहिल्या तीन वर्षांच्या कालांत दुभत्याच्या धंद्यासाठीं गुरांना लागणाऱ्या चाऱ्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**परदेशी डॉक्टर्सना बंदी**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें परदेशी डॉक्टरांना वैद्यकीय व्यवसाय करण्यास बंदी केली आहे. ब्रह्मदेशांत व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांत हिंदी डॉक्टरांची संख्या सर्वांत अधिक म्हणजे १७८ आहे. त्याशिवाय ८ पाकिस्तानी, ५ चिनी व एक ब्रिटिश डॉक्टर तेथें काम करीत होते. धंदा बंद करण्यास देण्यांत आलेली मुदत फार थोडी असल्याची तक्रार डॉक्टर्स करीत आहेत.

**तेलाच्या कारखान्यासाठीं यंत्रसामग्री**—गुजरातमध्यें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठीं लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याबाबत रशिआ व भारत ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें रशिआ भारताच्या तेल व नैसर्गिक वायुमंडळाला १३,३५० टन वजनाची यंत्रसामग्री पुरवील. कारखाना उभारण्यासाठीं रशियन तज्ज्ञ भारतांत येतील व हिंदी तज्ज्ञांनाहि रशियांत शिक्षण देण्यांत येईल.

**विम्याची सहकारी संस्था**—महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखान्यांची मध्यवर्ती संघटना, सहकारी बँका आणि औद्योगिक सहकारी संस्था एक सहकारी जनरल विमा संस्था स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार करीत आहेत. राज्य सरकार ह्या उपक्रमाला उत्तेजन देण्यास व कांहीं भाग भांडवल घेण्यास तयार आहे. भागभांडवल उभारण्याच्या कामीं फक्त सहकारी संस्थांनाच परवानगी देण्यांत येईल.

**काश्मीरला रेल्वेनें जोडणार**—काश्मीर व भारत ह्यांना जोडणारा रेल्वेमार्ग बांधण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. असा रेल्वेमार्ग बांधण्यासाठीं जरूर ती पाहणी रेल्वेबोर्डाच्या इंजिनिअर्सनीं केलेली आहे. त्यांच्या मतानें असा मार्ग बांधणें तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. हा मार्ग पठाणकोटपासून जम्मूमधील खाणीच्या विभागापर्यंत बांधण्यांत येण्याचा संभव आहे.

ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष २९ पुणें, बुधवार, १७ जुलै, १९६३ अंक १४

## विविध माहिती

**औषधी कारखान्याची यंत्रसामग्री**—रशियाच्या मदतीनें हैद्राबादजवळ काढण्यांत येत असलेल्या औषधांच्या कारखान्यासाठीं सुमारें १,५०० टन वजनाची यंत्रसामग्री लागणार आहे. किंमतीच्या दृष्टीनें विचार करतां ती ५ कोटी रुपयांची होईल. त्यांपैकीं १ कोटी रुपये किंमतीची यंत्रसामग्री रशियाकडून मिळालेली आहे. कारखाना १९६६ च्या प्रारंभीं बांधून पूर्ण होईल. तो चालविण्याचें शिक्षण घेण्यासाठी २५ इंजिनिअर्सना व तंत्रज्ञांना रशियांत पाठविण्यांत आलेलें आहे.

**राजकोटला यांत्रिक हत्यारांचा कारखाना**—सौराष्ट्रामधील दोघां उद्योगपतींनीं राजकोट येथें यांत्रिक हत्यारांचा कारखाना उभारण्याची तयारी चालविली आहे. त्यासाठी पश्चिम जर्मनींतील एका कारखान्याचें सहकार्य घेण्यांत येणार आहे. कारखान्याच्या यंत्रसामग्रीसाठी ५० लाख रुपये भांडवलाची कंपनी काढण्यांत येणार आहे. सौराष्ट्रांत निघणारा यांत्रिक हत्यारांचा हा पहिलाच कारखाना आहे. कारखान्यांत ३०० कामगारांना रोजगार मिळेल.

**कोळसाखाणींची यंत्रसामग्री**—कोळसाखाणींना लागणारी कांहीं विशेष प्रकारची यंत्रसामग्री तयार करणारा कारखाना काढण्यासाठी एका ब्रिटिश कंपनीनें मदत करण्याचें कबूल केलें आहे. राष्ट्रीय कोळसा विकासमंडळाच्या बंगालमधील कारखान्यांत ती बनविण्यांत येईल. हा नवा कारखाना दुर्गापूर येथील कोळसाखाणींची यंत्रसामग्री बनविणाऱ्या कारखान्याशिवाय आहे. दुर्गापूरच्या कारखान्याला रशियाची मदत आहे.

**कागदाच्या धंद्याचें तंत्रज्ञान**—कागद तयार करण्याच्या धंद्याचें तांत्रिक ज्ञान देणारी एक शिक्षणसंस्था उत्तर प्रदेशांत सहारणपूर येथें काढण्यांत येणार आहे. संस्था स्थापन करण्याचे कामीं स्वीडनच्या सरकारचें साह्य घेण्यांत येईल. संस्थेसाठी सुमारें १५ लाख रुपये लागणार असून त्यांपैकीं परदेशी चलनांतील खर्च स्वीडन सोसणार आहे. रुपयांतील खर्च भारत सरकार व उत्तरप्रदेश सरकार करणार आहे.

**खाणींसाठी लागणारी यंत्रसामग्री**—खाणींत वापरण्यांत येणारी कांहीं यंत्रसामग्री तयार करण्यासाठी हेवी एंजिनिअरिंग कॉर्पोरेशननें ग्लासगो येथील एका कंपनीशीं करार केला आहे. नॅशनल कोल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या वर्कशॉपमध्यें ती बनविण्यांत येईल. यंत्रसामग्री बनविण्यास लागणारें सर्व तांत्रिक साह्य ग्लासगोची कंपनी देणार आहे. त्याशिवाय ग्लासगो येथील कंपनीच्या कारखान्यांत हिंदी तंत्रज्ञांना शिक्षणहि कंपनी देणार आहे.

**राजधानींतील भिकारी**—दिल्लींतील भिकाऱ्यांची संख्या ५ हजारांच्या घरांत असल्याचें पाहणींत आढळून आलें आहे. हे भिकारी सर्व वेळ हाच धंदा करणारे आहेत; परंतु जत्रा अगर धार्मिक उत्सवप्रसंगीं त्यांची संख्या १० हजारपर्यंत वाढते. अशा दिवशीं उत्तर प्रदेश, पंजाब, इत्यादि राज्यांतून हंगामी भिकारी राजधानींत गर्दी करतात आणि त्यांना प्राप्तीहि चांगली होते.

**शेतीविकासासाठी मदत**—केरळ राज्यांतील एका शेतीच्या विकासाच्या कामाच्या प्राथमिक अवस्थेसाठी स्वित्झरलंडचें सरकार १६ लाख, ४० हजार स्विस फ्रँक्सची मदत देणार आहे. विकासाचीं सर्व कामें पुरीं होण्यास १२ वर्षें लागणार आहेत. पहिल्या तीन वर्षांच्या कालांत दुभत्याच्या धंद्यासाठी गुरांना लागणाऱ्या चाऱ्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे.

**परदेशी डॉक्टर्सना बंदी**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें परदेशी डॉक्टरांना वैद्यकीय व्यवसाय करण्यास बंदी केली आहे. ब्रह्मदेशांत व्यवसाय करणाऱ्या डॉक्टरांत हिंदी डॉक्टरांची संख्या सर्वांत अधिक म्हणजे १७८ आहे. त्याशिवाय ८ पाकिस्तानी, ५ चिनी व एक ब्रिटिश डॉक्टर तेथें काम करीत होते. धंदा बंद करण्यास देण्यांत आलेली मुदत फार थोडी असल्याची तक्रार डॉक्टर्स करीत आहेत.

**तेलाच्या कारखान्यासाठी यंत्रसामग्री**—गुजरातमध्यें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी लागणारी यंत्रसामग्री पुरविण्याबाबत रशिआ व भारत ह्यांच्या दरम्यान करार करण्यांत आला आहे. कराराप्रमाणें रशिआ भारताच्या तेल व नैसर्गिक वायुमंडळाला १३,३५० टन वजनाची यंत्रसामग्री पुरवील. कारखाना उभारण्यासाठीं रशियन तज्ज्ञ भारतांत येतील व हिंदी तज्ज्ञांनाहि रशियांत शिक्षण देण्यांत येईल.

**विम्याची सहकारी संस्था**—महाराष्ट्रांतील सहकारी साखर कारखान्यांची मध्यवर्ती संघटना, सहकारी बँका आणि औद्योगिक सहकारी संस्था एक सहकारी जनरल विमा संस्था स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार करीत आहेत. राज्य सरकार ह्या उपक्रमाला उत्तेजन देण्यास व कांहीं भाग भांडवल घेण्यास तयार आहे. भागभांडवल उभारण्याच्या कामीं फक्त सहकारी संस्थांनाच परवानगी देण्यांत येईल.

**काश्मीरला रेल्वेनें जोडणार**—काश्मीर व भारत ह्यांना जोडणारा रेल्वेमार्ग बांधण्याचा विचार मध्यवर्ती सरकार करीत आहे. असा रेल्वेमार्ग बांधण्यासाठी जरूर ती पाहणी रेल्वेबोर्डाच्या इंजिनिअर्सनीं केलेली आहे. त्यांच्या मतानें असा मार्ग बांधणें तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे. हा मार्ग पठाणकोटपासून जम्मूमधील खाणीच्या विभागापर्यंत बांधण्यांत येण्याचा संभव आहे.

# दि सरदार
# कारबोनिक गॅस कंपनी लि.

उत्पादक

**कारबोनिक ॲसिड गॅस**

**सुका बर्फ, सोडा वॉटर माशिनरी**

आणि

**खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते**

रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्टस्चें ऑफिस

सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२

शाखा आणि फॅक्टरी

१ केडल रोड, दादर, फ्रिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कॅंट ) टे. १०८
३ दिल्ली-रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०१
४ कलकत्ता-१०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७-२२४७
५ विजयवाडा-गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. १०४१
६ रावळपिंडी-हलहौसी रोड.

सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : ' कारबोनिक '



दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल
## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ-पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर-**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | २ टक्के |

**कायम ठेव-**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | ३·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ताः-युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

चालू :-०·५० टक्के. सेव्हिंग्ज् बँक :-२ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष-४¼ टक्के, २ वर्षें-४½ टक्के, ३ वर्षें-४¾ टक्के,
४ वर्षें-५ टक्के, ५ वर्षें-५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

शाखा-विस्तार

शाखा-१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई-गिरगांव, ३ मुंबई-दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर-मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंवज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१-१२-१९६२

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९,६०,८२५ |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ३,४३,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,००,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी.ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

# अर्थ

• बुधवार, १७ जुलै, १९६३



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सुवर्ण–नियंत्रण नियमांचा झालेला परिणाम

गेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें चीननें भारतावर आक्रमण केल्यावर उद्भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितींत भारत सरकारनें सुवर्ण–नियंत्रण नियम जाहीर करून अंमलांत आणले. ह्या नियमामुळें सोन्याच्या व्यापार-व्यवहारावर झालेल्या परिणामासंबंधीं अर्थखात्यानें एक छोटी पुस्तिका प्रसृत केली आहे. पुस्तिकेंत असें म्हटलें आहे कीं, सुवर्ण नियंत्रण-नियम जारी केल्यामुळें सोन्याची चोरटी आयात कमी झालेली आहे. परंतु सोन्याच्या किंमतीच्या पातळीवर मात्र ह्या नियमांचा व्हावा तसा परिणाम झालेला दिसत नाहीं. स्वतःच्या श्रीमंतीचें प्रदर्शन करणाऱ्या लोकांकडून सोन्याला मागणी येत असते. ही मागणी बंद पडल्याशिवाय अगर ती बऱ्याच प्रमाणांत कमी झाल्याशिवाय भारतामधील सोन्याची किंमत जगांतील सोन्याच्या किंमतीच्या जवळपास येणें अशक्य आहे. अशा रीतीनें कमी झालेली किंमतच सोन्याची वाजवी किंमत म्हणतां येईल. सुवर्णनियंत्रणाचा हुकूम जाहीर करण्यांत आल्यानंतर सोन्याची किंमत बऱ्याच प्रमाणांत घसरली; पण नंतर अलीकडे ती पुन्हा चढलेली आहे. तरीसुद्धां ऑगस्ट १९६२ मध्यें असलेल्या सोन्याच्या उच्चतम पातळीपेक्षा ती कमीच आहे. १९६२ च्या ऑगस्टमध्यें १० ग्रॅम सोन्याला १२९·९० रुपये किंमत द्यावीं लागत होती आणि अलीकडे सोन्याची किंमत वाढण्याचें एक कारण म्हणजे सोन्याचा अपुरा पुरवठा हें होय. सोन्याची बेकायदा आयात कमी झाल्याचीं कांहीं गमकें अशीं आहेत. ( १ ) सोन्याचा चोरटा व्यापार करणारांची मागणी कमी झाल्यामुळें लंडनमधील बाजारांत प्रमाणित सोनें प्रत्यक्ष ताब्यांत घेण्याच्या मुदती कमी करण्यांत आल्या आहेत. ( २ ) मुंबईमधील सोनें वितळविणाऱ्या भट्टयांमधील कामें बरींच रोडावलीं आहेत. ( ३ ) हॉंगकॉंग आणि मॅकाव ह्या ठिकाणीं सोन्याच्या किंमती उतरल्या आहेत. ( ४ ) सोनें शुद्ध करण्यासाठी नैट्रिक ॲसिड लागतें. दिल्ली येथील हें ॲसिड तयार करणाऱ्या कारखान्यांतील उत्पादन व विक्री बरीच कमी झाली आहे. ( ५ ) परदेशीय नाणेंबाजारांत भारतीय रुपयांना पहिल्याइतकी मागणी राहिलेली नाहीं. अर्थातच हिंदी चलनाचा बाहेर जाणारा ओघ मंदावला आहे.

सुवर्ण नियंत्रण–नियमांचें यश त्यांची अंमलबजावणी किती कसोशीनें होतें ह्यावर अवलंबून आहे. म्हणून सोन्याचा व्यापार–व्यवहार परवान्यानें करणारांच्या हिशेबांची नियमितपणें तपासणी करण्यांत येत आहे. गेल्या तीन–साडेतीन महिन्यांत परवान्याशिवाय सोन्याचा व्यापार करणारी अगर सोन्याचे दागिने बनविणारीं २,२०० प्रकरणें उजेडांत आणण्यांत आलीं आहेत. शुद्ध सोनें अगर सोन्याचे दागिने मिळून ४७ लाख रुपयांचें सोनें जप्त करण्यांत आलें आहे. सुमारें १३ हजार लोकांनीं आपल्याजवळील बिगरदागिन्यांतील सोन्याची माहिती कळविलेली आहे. दागिन्यांव्यतिरिक्त असलेल्या सोन्याचा अंदाज अपेक्षेइतका खरा ठरला नाहीं हें खरें. तथापि सोनें जाहीर करण्याच्या बाबतींत लबाडी किती प्रमाणांत झालेली आहे हें कळणें कठीण आहे. कदाचित् सुट्या शुद्ध सोन्यासंबंधीं केलेला अंदाजहि अवास्तव असण्याचा संभव आहे. सुवर्ण–नियंत्रण–नियम जारी करण्यापूर्वीं कित्येक महिने त्यांच्याबद्दल विचार करण्यांत आलेला होता. लोकांच्या संवयींत आणि सोन्याबद्दलच्या त्यांच्या वृत्तींत मोठा बदल घडवून आणण्यासाठी कायद्याचा आधार घेतल्याशिवाय भागणार नाहीं असें वाटल्यानेंच नियम जारी करण्यांत आले. शिवाय ह्या नियमांचा परिणाम वरिष्ठ व मध्यमवर्ग ह्यांच्यावरच होण्यासारखा आहे. बहुतेक इतर लोकांच्या जीवनांत सोन्याला फारसें स्थानच नाहीं.

---

## मीठ उत्पादन करणाऱ्या सहकारी संस्था

मध्यवर्ती सरकारचे समाजविकास आणि सहकार खातें मिठाचें उत्पादन करणाऱ्या आणखी सहकारी संस्था स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार करीत आहे. १९४८ सालीं अशा सहकारी संस्थांची संख्या अवघी ४ होती. १९५५-५६ सालापर्यंत त्यांची संख्या २९ पर्यंत वाढली. १९६२-६३ सालीं ४६ सहकारी संस्था उत्पादनाचें काम करीत होत्या. ह्या संस्थांच्या सभासदांची संख्या ७ हजार होती आणि त्यांनीं सुमारें ९,९०० एकर जमिनीचा मिठाच्या उत्पादनासाठी भाडेंपट्ट्यानें उपयोग चालविला होता. १९६२ सालीं ह्या संस्थांचें सरासरी उत्पादन ३७,७८८ टन पडलें. ह्या सालीं देशांत मिठाचें जें एकूण उत्पादन झालें त्याच्या ९·७ टक्के उत्पादन सहकारी संस्थांनीं केलें. मागासलेल्या वर्गांत सहकारी उत्पादक संघटनाचा प्रसार करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी एक अभ्यासगट सरकारनें नेमला होता. त्या गटानें सहकारी मीठ-उत्पादकांच्या संख्येंत टप्प्याटप्प्यानें वाढ करण्यांत यावी, आणि १९६५-६६ च्या सुमारास अशा संस्थांच्यामार्फत मिठाच्या एकूण उत्पादनाच्या ५० टक्के उत्पादन करण्यांत यावें अशी शिफारस केली होती. हें साध्य करण्यासाठी प्रत्येकी २०० सभासद असलेल्या १०० नव्या सहकारी संस्था सुरू करण्यांत याव्यात असेंहि सुचविण्यांत आलें होतें. शिफारशींना अनुसरून सरकारनें मिठाच्या सहकारी संस्था काढण्यासाठी बऱ्याच सवलती जाहीर केल्या होत्या; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. अशा संस्था स्थापन करण्याच्या कामीं अडचणी अनुभवास आल्या. सर्वसामान्यपणें ह्या संस्थांना द्रव्यबळ पुरेसें उपलब्ध होत नाहीं असें दिसून आलें.

---

## गोव्याला विजेचा पुरवठा

उत्तर गोव्यांतील ग्रामीण भागाला विजेच्या शक्तीचा पुरवठा करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी सुमारें ५० हजार रुपये खर्च येणार आहे. पावसाळा सुरू झाल्यामुळें कामांत खंड पडला आहे. तथापि सावंतवाडीपर्यंत तारा टाकण्याचें काम पूर्ण झालें आहे. ऑक्टोबरपासून पुढील काम हातीं घेण्यांत येईल.

# अर्थ

• बुधवार, १७ जुलै, १९६३





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सुवर्ण–नियंत्रण नियमांचा झालेला परिणाम

गेल्या ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्यें चीननें भारतावर आक्रमण केल्यावरं उद्‌भवलेल्या आणीबाणीच्या परिस्थितींत भारत सरकारनें सुवर्ण–नियंत्रण नियम जाहीर करून अंमलांत आणले. ह्या नियमामुळें सोन्याच्या व्यापार-व्यवहारावर झालेल्या परिणामासंबंधीं अर्थखात्यानें एक छोटी पुस्तिका प्रसृत केली आहे. पुस्तिकेंत असें म्हटलें आहे कीं, सुवर्ण नियंत्रण-नियम जारी केल्यामुळें सोन्याची चोरटी आयात कमी झालेली आहे. परंतु सोन्याच्या किंमतीच्या पातळीवर मात्र ह्या नियमांचा व्हावा तसा परिणाम झालेला दिसत नाहीं. स्वतःच्या श्रीमंतीचें प्रदर्शन करणाऱ्या लोकांकडून सोन्याला मागणी येत असते. ही मागणी बंद पडल्याशिवाय अगर ती बऱ्याच प्रमाणांत कमी झाल्याशिवाय भारतामधील सोन्याची किंमत जगांतील सोन्याच्या किंमतीच्या जवळपास येणें अशक्य आहे. अशा रीतीनें कमी झालेली किंमतच सोन्याची वाजवी किंमत म्हणतां येईल. सुवर्णनियंत्रणाचा हुकूम जाहीर करण्यांत आल्यानंतर सोन्याची किंमत बऱ्याच प्रमाणांत घसरली; पण नंतर अलीकडे ती पुन्हा चढलेली आहे. तरीसुद्धां ऑगस्ट १९६२ मध्यें असलेल्या सोन्याच्या उच्चतम पातळीपेक्षा ती कमीच आहे. १९६२ च्या ऑगस्टमध्यें १० ग्रॅम सोन्याला १२९.९० रुपये किंमत द्यावी लागत होती आणि अलीकडे सोन्याची किंमत वाढण्याचें एक कारण म्हणजे सोन्याचा अपुरा पुरवठा हें होय. सोन्याची बेकायदा आयात कमी झाल्याचीं कांहीं गमकें अशीं आहेत. ( १ ) सोन्याचा चोरटा व्यापार करणारांची मागणी कमी झाल्यामुळें लंडनमधील बाजारांत प्रमाणित सोनें प्रत्यक्ष ताब्यांत घेण्याच्या मुदती कमी करण्यांत आल्या आहेत. ( २ ) मुंबईमधील सोनें वितळविणाऱ्या भट्टयांमधील कामें बरींच रोडावलीं आहेत. ( ३ ) हाँगकाँग आणि मॅकाव ह्या ठिकाणीं सोन्याच्या किंमती उतरल्या आहेत. ( ४ ) सोनें शुद्ध करण्यासाठी नैट्रिक ॲसिड लागतें. दिल्ली येथील हें ॲसिड तयार करणाऱ्या कारखान्यांतील उत्पादन व विक्री बरीच कमी झाली आहे. ( ५ ) परदेशीय नाणेंबाजारांत भारतीय रुपयांना पहिल्याइतकी मागणी राहिलेली नाहीं. अर्थातच हिंदी चलनाचा बाहेर जाणारा ओघ मंदावला आहे.

सुवर्ण नियंत्रण-नियमांचें यश त्यांची अंमलबजावणी किती कसोशीनें होतें ह्यावर अवलंबून आहे. म्हणून सोन्याचा व्यापार–व्यवहार परवान्यानें करणारांच्या हिशेबांची नियमितपणें तपासणी करण्यांत येत आहे. गेल्या तीन–साडेतीन महिन्यांत परवान्याशिवाय सोन्याचा व्यापार करणारी अगर सोन्याचे दागिने बनविणारीं २,२०० प्रकरणें उजेडांत आणण्यांत आलीं आहेत. शुद्ध सोनें अगर सोन्याचे दागिने मिळून ४७ लाख रुपयांचें सोनें जप्त करण्यांत आलें आहे. सुमारें १३ हजार लोकांनीं आपल्याजवळील बिगरदागिन्यांतील सोन्याची माहिती कळविलेली आहे. दागिन्यांव्यतिरिक्त असलेल्या सोन्याचा अंदाज अपेक्षेइतका खरा ठरला नाहीं हें खरें. तथापि सोनें जाहीर करण्याच्या बाबतींत लबाडी किती प्रमाणांत झालेली आहे हें कळणें कठीण आहे. कदाचित् सुटया शुद्ध सोन्यासंबंधीं केलेला अंदाजहि अवास्तव असण्याचा संभव आहे. सुवर्ण–नियंत्रण–नियम जारी करण्यापूर्वीं कित्येक महिने त्यांच्याबद्दल विचार करण्यांत आलेला होता. लोकांच्या सवयींत आणि सोन्याबद्दलच्या त्यांच्या वृत्तींत मोठा बदल घडवून आणण्यासाठी कायद्याचा आधार घेतल्याशिवाय भागणार नाहीं असें वाटल्यानेंच नियम जारी करण्यांत आले. शिवाय ह्या नियमांचा परिणाम वरिष्ठ व मध्यमवर्ग ह्यांच्यावरच होण्यासारखा आहे. बहुतेक इतर लोकांच्या जीवनांत सोन्याला फारसें स्थानच नाहीं.

## मीठ उत्पादन करणाऱ्या सहकारी संस्था

मध्यवर्ती सरकारचें समाजविकास आणि सहकार खातें मिठाचें उत्पादन करणाऱ्या आणखी सहकारी संस्था स्थापन करण्याच्या शक्यतेचा विचार करीत आहे. १९४८ सालीं अशा सहकारी संस्थांची संख्या अवघी ४ होती. १९५५-५६ सालापर्यंत त्यांची संख्या २९ पर्यंत वाढली. १९६२-६३ सालीं ४६ सहकारी संस्था उत्पादनाचें काम करीत होत्या. ह्या संस्थांच्या सभासदांची संख्या ७ हजार होती आणि त्यांनीं सुमारें ९,९०० एकर जमिनीचा मिठाच्या उत्पादनासाठी भाडेपट्टयानें उपयोग चालविला होता. १९६२ सालीं ह्या संस्थांचें सरासरी उत्पादन ३७,७८८ टन पडलें. ह्या सालीं देशांत मिठाचें जें एकूण उत्पादन झालें त्याच्या ९.७ टक्के उत्पादन सहकारी संस्थांनीं केलें. मागासलेल्या वर्गांत सहकारी उत्पादक संघटनाचा प्रसार करण्यासाठी उपाय सुचविण्यासाठी एक अभ्यासगट सरकारनें नेमला होता. त्या गटानें सहकारी मीठ-उत्पादकांच्या संख्येंत टप्प्याटप्प्यानें वाढ करण्यांत यावी, आणि १९६५-६६ च्या सुमारास अशा संस्थांच्यामार्फत मिठाच्या एकूण उत्पादनाच्या ५० टक्के उत्पादन करण्यांत यावें अशी शिफारस केली होती. हें साध्य करण्यासाठी प्रत्येकी २०० सभासद असलेल्या १०० नव्या सहकारी संस्था सुरू करण्यांत याव्यात असेंहि सुचविण्यांत आलें होतें. शिफारशींना अनुसरून सरकारनें मिठाच्या सहकारी संस्था काढण्यासाठी बऱ्याच सवलती जाहीर केल्या होत्या; परंतु त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. अशा संस्था स्थापन करण्याच्या कामीं अडचणी अनुभवास आल्या. सर्वसामान्यपणें ह्या संस्थांना द्रव्यबळ पुरेसें उपलब्ध होत नाहीं असें दिसून आलें.

## गोव्याला विजेचा पुरवठा

उत्तर गोव्यांतील ग्रामीण भागाला विजेच्या शक्तीचा पुरवठा करण्याचें महाराष्ट्र सरकारनें ठरविलें आहे. ह्या कामासाठी सुमारें ५० हजार रुपये खर्च येणार आहे. पावसाळा सुरू झाल्यामुळें कामांत खंड पडला आहे. तथापि सावंतवाडीपर्यंत तारा टाकण्याचें काम पूर्ण झालें आहे. ऑक्टोबरपासून पुढील काम हातीं घेण्यांत येईल.

## अणुशक्तीवरील विजेसाठी इंधनाचा पुरवठा

मुंबईच्या उत्तरेला ६२ मलावर तारापूर ह्या ठिकाणीं स्थापन करण्यांत येणाऱ्या अणुशक्तीजनित विजेच्या केंद्रासाठी अमेरिकेनें ८ कोटी डॉलर्स अथवा ३८·१ कोटी रुपयांचें कर्ज मंजूर केलें आहे. केंद्र १९६७ सालीं पुरें व्हावयाचें असून त्यांत ३ लाख, ८० हजार किलोवॅट वीज उत्पन्न होऊं शकेल. वीजकेंद्रांतील अणुभट्टीसाठी लागणारें इंधन प्रारंभीं अमेरिका पुरविणार आहे. तथापि, भारत सरकार अशा प्रकारचें अणुइंधन स्वतःच तयार करण्याच्या खटपटींत आहे. त्यासाठी बिहारमधील जडुगुडा खाणीच्या कामाला १९६१ सालीं मंजुरी देण्यांत आली, ह्या ठिकाणीं बिहार सरकारनें ४६२ एकर जागा ताब्यात घेतली आहे. बिहारमधील सिंगभुम जिल्ह्यांत जडुगुडा खाणी आहेत. येथें युरेनिअमचें खानिज निर्माण करण्याचा कारखाना काढण्यांत येणार आहे. त्यासाठी सुमारें ५·५ कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यांत आला आहे. खाणींच्या विभागाची भूगर्भ-विषयक पहाणी तपशीलवार करण्याचें काम आतां पूर्ण झालें आहे. युरेनियम तयार करण्याचा कारखाना १९६४ च्या अखेरीस दररोज १ हजार युरेनिअमचें खानिज उत्पादन करूं शकेल अशी अपेक्षा आहे. तारापूर येथें स्थापन करण्यांत यावयाच्या वीजकेंद्राला लागणारें अधिक इंधन तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल संकल्पित कारखाना पुरेशा प्रमाणांत पुरवूं शकेल. जडुगुडा येथील युरेनिअमच्या खाणी भारत सरकारच्या अणुशक्ती मंडळाच्या अखत्यारांत राहणार आहेत. खाणी चालविण्यासाठी आतां एका मॅनेजरची नेमणूक करण्यांत आली असून त्याच्या हाताखाली ३०० अधिकारी व इतर नौकरवर्ग नेमण्यांत आला आहे. ह्या नौकरांसाठी एक वसाहतच उभारण्यांत येत आहे.

---

## चंद्राभोंवतीं प्रदक्षिणा घालण्याचा प्रयत्न ?

ब्रिटनच्या जार्डेल बॅंक वेधशाळेचे संचालक मि. बर्नार्ड लॅविल रशियाच्या मध्यवर्ती शास्त्रीय संशोधनसंघटनेच्या आमंत्रणावरून मॉस्कोला गेले आहेत. ते रशिआचा तीन आठवड्यांचा दौरा करतील. रशिआच्या अंतराळ शास्त्राच्या प्रगतीविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, १९७० पूर्वी चंद्रावर मनुष्य पाठविण्याचा प्रयत्न रशिआला करावयाचा असेल, तर एक-दोन वर्षांच्या आंत चंद्राला प्रदक्षिणा घालून परत पृथ्वीवर येण्यासाठी मनुष्य असलेला अग्निबाण चंद्राभोंवतीं पाठविण्याचा प्रयत्न त्याला करावा लागेल. असा प्रयत्न लवकर होण्याची शक्यता आहे.

---

## दंतवैद्यकाच्या धंद्याची जागतिक पहाणी

स्टॉकहोम येथें दंतवैद्यांची एक परिषद् भरविण्यांत आली होती. परिषदेला हजर राहण्यासाठी दंतवैद्यांचें आंतरराष्ट्रीय प्रतिनिधिमंडळ गेलें होतें. प्रतिनिधिमंडळाचा नेता कलकत्त्यांत बोलतांना म्हणाला कीं, भारतांत दंतविकार कमी प्रमाणांत आढळतात; परंतु हिरड्या मऊ होणें अगर खराब होणें मात्र मोठ्या प्रमाणावर आढळून येतें. आग्नेय आशिया आणि भारत ह्यांच्याशीं तुलना करतां अमेरिकेंत दंतरोगाचें प्रमाण अधिक आहे. साखर आणि इतर गोड पदार्थ वाजवीपेक्षा अधिक खाण्याच्या संवयीमुळें पाश्चिमात्य देशांतील लोकांचे दांत लवकर निकामी होतात. अर्थातच अमेरिकेंत कृत्रिम दांत लावणारे लोक नेहमींच आढळून येतात. स्टॉकहोम येथील परिषद् दंतवैद्यकाच्या धंद्याचा जागतिक पातळीवरून विचार करण्यासाठी भरली होती.

## विकासाच्या कामांसाठी लागणारा पैसा

भारताचे आंतरराष्ट्रीय व्यापारखात्याचे मंत्रि श्री. मनुभाई शहा कलकत्ता येथें बोलतांना म्हणाले कीं देशांतील विकासाचीं कामें करण्यासाठी प्रचंड प्रमाणावर पैशाची गरज आहे. हा पैसा निर्यातींत वाढ करूनच फक्त मिळूं शकेल. निरनिराळ्या प्रकारच्या मालाची निर्यात वाढविण्यासाठी जीं मंडळें स्थापन करण्यांत आलीं आहेत त्यांनीं निर्यातीसाठी ठरविण्यांत आलेलीं उद्दिष्टें गांठण्याचे जास्तींत जास्त प्रयत्न केले पाहिजेत. भारताची अर्थव्यवस्था वर्धिष्णु आहे. परंतु निर्मितीकडे दुर्लक्ष करण्यांत आल्यास अशी अर्थव्यवस्थाहि खुरटून गेल्याखेरीज राहणार नाहीं. परदेशांत भारताच्या मालाची मागणी वाढत चाललेली आहे. तेव्हां अशा वेळीं कोठल्याहि उद्योगधंद्याला निराश होण्याचें मुळींच कारण नाहीं.

---

## तेलाच्या उत्पादनवाढीसाठी अणुस्फोटाचा उपयोग

फ्रँकफर्ट येथें ६ वी जागतिक पेट्रोलिअम काँग्रेस भरविण्यांत आली होती. ह्या काँग्रेसमध्यें फ्रेंच पेट्रोलिअम इन्स्टिट्यूटचे डायरेक्टर मि. पिरो ह्यांनीं शास्त्रीय प्रगति व औद्योगिक विकास ह्या विषयांवर एक निबंध वाचला. ह्या निबंधांत त्यांनीं अशी सूचना केली आहे कीं तेलाचें उत्पादन वाढविण्यासाठी भूमिगत अणुस्फोटांचा उपयोग करण्यांत यावा. त्यांच्या मतानें तेलाचें उत्पादन वाढविण्यासाठी अणुस्फोटाचा प्रयोग करून पहाण्यास हरकत नाहीं. अणुशक्तीचा असा उपयोग केल्यास तेलाचे साठे शोधण्याचें काम अधिक निश्चितपणें करतां येईल, असें त्यांचें म्हणणें आहे.

---

## बडोद्याच्या विमानतळाचा विस्तार

बडोद्याच्या विमानतळाचा विस्तार व सुधारणा करण्यांत यावी अशी मागणी गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सनें भारत सरकारच्या वाहतूक आणि दळणवळण खात्याकडे केली आहे. चेंबरतर्फे पाठविण्यांत आलेल्या निवेदनांत असें म्हटलें आहे कीं कोयाली येथील तेलशुद्धीचा कारखाना व रासायनिक खताचा कारखाना चालू झाल्यावर बडोदा हें ठिकाण विमानवाहतुकीचें मोठें केंद्र होईल; म्हणून त्याचा विस्तार करण्याची अतिशय आवश्यकता आहे.

---

## बचत करण्याच्या संवयींत जपानी अग्रेसर

बचत करण्याची संवय लावण्यासाठी भारतांत कायद्याचा आश्रय घ्यावा लागला आहे. जपानमध्यें मात्र लोक स्वयंस्फूर्तीनें बचत करीत असल्याचें दिसून येतें. ह्यासंबंधीं संयुक्तराष्ट्र-संघटनेतर्फे १९६० सालीं जमा करण्यांत आलेल्या आंकड्याप्रमाणें जपानी नागरिक आपल्या उत्पन्नाच्या २० टक्के बचत करतो असें आढळून आलें आहे. प्राप्तीवरील कर वजा करतां व्यक्तिशः बचत करण्याचा हा दर जगांत सर्वांत अधिक आहे. टोकिओमध्यें बचतीची संघटना करणारी एक मध्यवर्ती संस्था आहे. सदर संस्थेनें जमविलेल्या माहितीप्रमाणें डच नागरिक व्यक्तिशः उत्पन्नाच्या १६·१ टक्के बचत करतो. पश्चिम जर्मनीचा नागरिक १४·७ टक्के बचत करतो. डेन्मार्कचा नागरिक १०·८ टक्के बचत करतो. अमेरिकन व ब्रिटिश नागरिक सुमारें ६·६ टक्के बचत करतात.

---

## "मनांतलें कळूं न देतां बोलण्याची कला"

### रिझर्व्ह बँकेचा 'करन्सी फिनॅन्स' विषयीं अहवाल

रिझर्व्ह बँक म्हणजे कांहीं अर्थखात्याचें एक उपखातें नव्हे; तिला स्वतंत्र अस्तित्व आहे आणि तिच्याकडून कांहीं अपेक्षा आहेत. सरकारी आर्थिक धोरणाला केवळ टेकू देणें, अशी तिची भूमिका असता कामा नये. रिझर्व्ह बँक सरकारला गुप्त रीतीनें सल्ला देत असेलहि; सरकारी योजनांवर कडक टीकाहि करीत असेल. जनतेला तें कळण्याचा कांहींहि मार्ग नाहीं. आपल्या करन्सी आणि फिनॅन्सवरील अहवालांत रिझर्व्ह बँकेनें तशी कामगिरी केल्याचा उल्लेख आढळत नाहीं; आणि अहवालांतहि कुठें तक्रारीचा किंवा असमाधानाचा शब्द नाहीं. ह्याचा अर्थ रिझर्व्ह बँक आपलें कर्तव्य पार पाडण्यांत चुकारपणा करीत आहे, असें केला जाण्याचा संभव आहे. "कॅपिटल" ह्या आर्थिक साप्ताहिकानें केलेली टीका ह्या दृष्टीनें उद्‌बोधक आहे.

"भित्रेपणा व मिळमिळीतपणा ह्या बाबतींत रिझर्व्ह बँकेच्या करन्सी आणि फिनॅन्सवरील १९६२-६३ च्या अहवालानें उच्चांक गांठला आहे! ह्या ३०० पानांच्या अहवालांत सरकारशीं मतभेद किंवा टीका ह्याचा लवलेशहि आढळत नाहीं. अर्थमंत्र्यांच्या पायाशीं असलेल्या बंधा गुलामाच्या भूमिकेपेक्षा रिझर्व्ह बँकेची दुसरी कांहीं भूमिका नाहींच कीं काय? प्रवृत्तींची नोंद केली आहे, घटनांची यादी दिली आहे; परंतु केलेली उपाययोजना योग्य ठरली किंवा नाहीं, अधिक चांगली उपाययोजना करतां आली असती का, देशापुढील खरे प्रश्न कोणते, ते कसे सोडवले पाहिजेत, ह्यांविषयीं अहवाल अगदीं मुग्ध आहे. रिझर्व्ह बँकेचे टंकलेखक त्यांच्या कामाबद्दल अभिनंदनास पात्र आहेत, परंतु वरिष्ठ अधिकाऱ्यांनीं मात्र अभिनंदन करण्याजोगें डोकें वापरलेलें नाहीं.

"गेल्या वर्षीं भारताची आर्थिक परिस्थिति घोटाळ्याची होती, असा निष्कर्ष अहवालावरून आपण काढूं शकतों, पण रिझर्व्ह बँक मात्र तसें म्हणत नाहीं; कारण त्याला धाडस पाहिजे. पण त्या मुग्धतेमुळें वस्तुस्थिति थोडीच बदलणार आहे? भारताच्या कोणत्याच आर्थिक क्षेत्रांत सुधारणा झालेली नाहीं, हें सत्य आहे. शेतीचें, त्यांतल्या त्यांत अन्नधान्यांचें उत्पादन थोडें वाढलें आहे, पण १९६०-६१ मधील उत्पादनाच्या मानानें तें फारसें जास्त नाहीं. औद्योगिक उत्पादनाची गति पहिल्या कांहीं महिन्यांत मंदावली होती. पण चिनी आक्रमणामुळें पुढील कांहीं महिन्यांत ती सुधारली. एकूण वाढ १९६१ च्या मानानें जास्त नाहीं. निष्क्रिय यंत्रसामग्रीचें प्रमाण वाढलें. निर्गतींत वाढ झाली, पण त्याचें श्रेय श्री. मनुभाई शहांना नसून श्री. कृष्ण मेनन ह्यांना आहे; गोवा, दमण आणि दिव हे निर्गत करणारे प्रदेश भारतांत समाविष्ट केले गेले नसते, तर निर्गत कमी झालेलीच दिसून आली असती. परदेशी हुंडणावळीची पुंजी अजिबात संपुष्टांत आली नाहीं, ह्याबद्दल रिझर्व्ह बँकेनें सुस्कारा सोडला आहे. १९६२-६३ च्या उत्तरार्धांत बँकिंग भांडवलाची मोठी आयात झाली; नाहींतर परराष्ट्रीय येण्या-देण्यांतील प्रतिकूल तफावत आणखी वाढली असती, असें रिझर्व्ह बँकेनें म्हटलें आहे.

"परदेशी हुंडणावळीच्या खडखडाटाला अंतर्गत बाजारभाव वाढीनें साथ दिली. १९६२-६३ मध्यें किंमती वाढल्या, पण पूर्वीच्या वर्षांच्या वाढीच्या मानानें गति जास्त नव्हती, हें म्हणण्याचा उद्देश 'काळजी करण्याइतकी किंमतवाढ झालेली नाहीं' असें सुचविण्याचा असावा. किंमतवाढ रोखून धरण्यासाठी केलेल्या योजनांची लांब यादी अहवालांत देण्यांत आली आहे, परंतु त्यांच्या फलश्रुतीबद्दल कुठेंहि असमाधान व्यक्त करण्यांत आलेलें नाहीं. मुख्यतः तुटीच्या अर्थव्यवस्थेमुळें, नोटा छापून देणीं भागविल्यामुळें, बेसुमार चलनवाढ झाली आहे, ह्याची चिकित्सा करणें रिझर्व्ह बँकेला आवश्यक वाटलें नाहीं. शेतीच्या उत्पादनांत वाढ पुरेशी होत नसतांना, औद्योगिक उत्पादन-शक्तीच्या वापराला कच्चा माल, पोलाद, कोळसा, वाहतूक, इत्यादींच्या तुटवड्यामुळें आळा बसला असतांना ही चलनवाढ होत आहे, ही गोष्ट विसरतां कामा नये.

"अर्थव्यवस्थेवर बजेटांच्या होणाऱ्या परिणामाकडे रिझर्व्ह बँकेचे तज्ज्ञ लक्ष देण्यासहि तयार नाहींत. बँकेची परंपराच तशी आहे; जें कांहीं म्हणावयाचें तें अगदीं हळू आवाजांत, संमति-निदर्शकच; अर्थखात्याची एवढी गुलामगिरी तिनें पत्करली आहे. सबंध अहवालावर खोट्या समाधानाची छाया पडलेली आहे. परदेशी मदत आतां अधिक सौम्य अटींवर मिळत आहे, ह्याबद्दल आनंद व्यक्त करतांना, देऊं केलेल्या पण न वापरलेल्या मदतीच्या रकमेचा आंकडा मार्च १९६२ मधील १३८९ कोटी रुपयांवरून मार्च १९६३ मध्यें १५९४ कोटी रुपयांवर गेला आहे, ह्याबद्दल तक्रारीचा एक शब्दहि नाहीं. रिझर्व्ह बँकेला जें वाटतें तें तिनें बोलून दाखविलें नाहीं, तर तिला विचार करण्याची कुवतच नाहीं, असा समज पसरण्याची भीति आहे."

---

## पलाई बँकेच्या ठेवीदार-कर्जदारांना सेट-ऑफ मिळणार

### केरळ हायकोर्टाच्या फुलबेंचाचा महत्त्वपूर्ण निर्णय

लिक्विडेशनमध्यें गेलेल्या पलाई सेंट्रल बँकेच्या कित्येक मुदती-ठेवीदारांनीं आपल्या ठेवींच्या तारणावर बँकेकडून कर्जे घेतलेलीं होतीं. लिक्विडेटरनें ह्या कर्जाच्या फेडीसाठी तगादा लावला, तेव्हां आमच्या ठेवींचा कर्जफेडीसाठी विनियोग करा, असें कर्जदार ठेवीदारांनीं सांगितलें. पण लिक्विडेटरनें तें ऐकलें नाहीं; तेव्हां कांहीं कर्जदार ठेवीदारांनीं केरळ हायकोर्टांत अर्ज करून सेट्-ऑफ मागितला. न्यायमूर्ति पी. टी. रामन् नायर ह्यांनीं अर्ज फेटाळून लावला. त्यावर फुलबेंचाकडे अपील करण्यांत आलें. इन्सॉल्व्हन्सीचा कायदा ह्या प्रकरणीं लागू केला पाहिजे, असें सांगून फुलबेंचानें न्या. रामन् नायर ह्यांचा निर्णय फिरविला. "मुदती ठेवींच्या पावतीवरील एंडॉर्समेंट आणि बँकेला दिलेलें पत्र व पावतीचा ताबा, ह्यामुळें ठेवीवर बँकेचा फक्त चार्ज निर्माण होतो; अशा तारणावरील बँकेच्या कर्जास ठेवीदारांचें बिन-तारणी कर्ज (ठेव) सेट्-ऑफ करता येतें" असें फुलबेंचानें ठरविलें आहे.

---

## रिझर्व्ह बँकेची भायखळा कचेरी

रिझर्व्ह बँकेनें भायखळा येथें आपली एक कचेरी तेथील स्वतःच्याच इमारतींत, बॉंबे सेंट्रल रेल्वे-स्टेशनसमोर, उघडली आहे. सक्तीच्या डिपॉझिट योजनेनुसार ठेवी स्वीकारणें, एवढेंच तूर्त तिचें काम राहील. बँकेच्या फोर्ट विभागांतील कचेरींतहि ठेवी स्वीकारल्या जातात; पण तेथील गर्दी टाळण्यासाठी लोकांनीं भायखळा कचेरीचा फायदा घ्यावा, असें सुचविण्यांत आलें आहे.

---

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि., विश्रामबाग–सांगली

स्थापना ता. १० सप्टेंबर १९४७ रोजीं, इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ खालीं रजिस्टर होऊन झाली. १९४८ पासून प्रत्यक्ष उत्पादनास लहान प्रमाणांत सुरुवात झाली व १९५० सालीं मॅनेजिंग एजन्सीमध्यें दोन नवीन पार्टनर्स समाविष्ट करून घेतले, नंतर शेतकी अवजारें, सेन्ट्रिफ्युगल पंप्स् व फूट–व्हॉल्व्हज् यांचे उत्पादनास सुरुवात झाली. प्रथम दरमहा १२ पंप तयार होऊं लागले. सन १९५२–५३ मध्यें बोअरिंगचे हात पंप्स् बनवूं लागले. हळूहळू प्रॉडक्शनमध्यें वाढ होऊन पंप्स् दरमहा २०–२५ व लोखंडी नांगर पांचशें दरवर्षीं तयार होऊं लागले.



सन १९५५–५६ मध्यें पुन्हां उत्पादनांत वाढ होऊन सन १९६२ मध्यें व आतांपर्यंत दरमहा १०० ते १२५ निरनिराळया साईजचे सेन्ट्रिफ्युगल पंप्स् इले. मोटारला जोडण्याकरितां व नांगर सुमारें २००० तयार होऊं लागले. कंपनीनें नवीन प्रॉडक्शन पिलर टाईप ड्रिलिंग मशीन १″ कॅपॅसिटीचें तयार केलें असून दरमहा एक मशीन तयार होऊं लागलें आहे. फौन्ड्रीमध्येंहि वाढ होऊन मोठ्या मोठ्या कारखान्यास लागणारे इंजिन स्पेअर पार्ट्स् व क्वालिटी कास्टिंग्ज पुरविण्यास आरंभ झाला. हल्लीं कारखान्यांत खालीलप्रमाणें माल तयार होऊं लागला आहे.

(१) लोखंडी नांगर, लहान, मध्यम व मोठ्या आकाराचे, दहा, आठ व सहा बैली; फाळ व सुटे भाग, तसेंच उंसाचे शेती-साठी सरीचा नांगर.

(२) सेन्ट्रिफ्युगल पंपस् १″ ते ४′ इरिगेशनसाठीं, इले मोटार व इंजिनला जोडण्याकरितां.

(३) स्क्रूड व फॅलन्जड फूट–व्हॉल्व्हज्.

(४) बोअरिंगचे हात पंप्स्.

(५) लोखंडी हातरहाट.



**कृषिमंत्र्यांची भेट**

डावीकडून—(१) उपमंत्री बॅ. जी. डी. पाटील (२) शेठ घेवारी (३) कृषिमंत्री ना. बाळासाहेब देसाई (४) ज. मॅनेजर शामराव भिरंगी (५) गुलाबराव पाटील (६) आ. वसंतराव पाटील (७) डी. एम. कुडचीकर (८) रावसाहेब चव्हाण (९) पी. व्ही. ओगले.

(६) पिलर टाईप ड्रिलिंग मशिन १″ कॅपॅसिटी.

(७) कास्ट आयर्न स्पेशल क्वालिटी कास्टिंग्ज.

कारखान्यांत हल्लीं ९५ नोकरवर्ग आहे.

ता. २४–३–६३ रोजीं शेतकी मंत्री नामदार बाळासाहेब देसाई, उपमंत्री राजारामबापू पाटील, जी. डी. पाटील व आमदार वसंतराव पाटील, सांगली जिल्ह्याचे कलेक्टर श्री. शिंदे व इतर अधिकारी यांनीं भेट देऊन कारखान्याचें कामकाज पाहून समाधान व्यक्त केलें.

कारखान्याचे जनरल मॅनेजर, श्री. एस. बी. भिरंगी, A. M. I. S. E, M S. M. A. हे अनुभविक इंजिनीयर असून त्यांना २५ वर्षांचा अनुभव या धंद्यांतील आहे. मॅनेजिंग एजंटस मे. इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कं. असून डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन श्री. विनायकराव शिरगांवकर हे आहेत, व बोर्डामध्यें श्री· केशवराव चौगुले, ॲडव्होकेट, श्री. बाळासाहेब कोरे, वकील यांचा समावेश आहे.

### साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी परवाने

साखरेच्या उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून नवीन कारखान्यांस परवाने देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. तदनुसार नवीन कारखाने काढण्यासाठी व सध्यांच्या कारखान्यांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारांनीं शिफारस केलेल्या शिलकी अर्जाचा विचार करण्याचें काम हातीं घेण्यांत येत आहे. यासाठी संबंधित खात्यांच्या प्रतिनिधींची एक समिति स्थापण्यांत आली आहे. पुढील दोन–तीन वर्षांत आणखी ५ लाख टन साखरेचें उत्पादन व्हावें हा यामागील हेतु आहे. सदर समिति हें काम तीन महि-न्यांत पूर्ण करण्याची अपेक्षा आहे.

### बोइंग विमानाला लागणाऱ्या टायर्स

बोइंग विमानांना लागणाऱ्या टायर्स भारतांत तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कलकत्ता येथील डनलॉप रबर कारखान्यानें तयार केलेल्या कांहीं टायर्स चांचाणीसाठी लंडनला पाठविण्यांत आल्या आहेत. बोइंग विमान जड असल्यामुळें त्याच्या टायर्स विशेष मजबूत असाव्या लागतात. शिवाय त्याचा उतरण्याचा वेगहि फार असल्यानें उतरतांना टायर्सवर चांगलाच ताण पडतो.

### हिंदुस्थान मशीन टूल्सला २·१५ कोटी रुपये निव्वळ नफा

हिंदुस्थान मशीन टूल्सला १९६२–६३ मध्यें २·१५ कोटी रुपये निव्वळ नफा झाला. १० टक्के डिव्हिडंड जाहीर केला. सदर कारखान्यास झालेला हा निव्वळ नफा ६·५६ कोटी रुपये भागभांडवलावरील ३३ टक्के उत्पन्न होय. मागील वर्षाचा हा आंकडा २४ टक्के होता. या कारखान्यानें जाहीर केलेला १० टक्के डिव्हिडंड हा सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांत लागोपाठ तिसऱ्या वर्षी देऊं केलेला सर्वांत जास्त डिव्हिडंड होय.

### साखरकारखाने बंद पडण्याचा संभव

उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागांतील १२ साखर कारखाने ह्या वर्षी बंद करण्यांत येण्याचा संभव आहे. दोन कारखान्यांनीं राज्य सरकारला तशी सूचनाहि दिली आहे. सरकारनें ठरवून दिलेली साखरेची किंमत परवडण्यासारखी नसल्यानें साखरकारखान्यांना कारखाने बंद ठेवावे लागतील असें कारण सांगण्यांत येत आहे. कानपूरमधील साखरव्यापाऱ्यांच्या संघटनेनें साखरेच्या किंमती-वरील नियंत्रणें रद्द करण्याची मागणी केली आहे.

## न्यू विजय इंडस्ट्रीज लि., विश्रामबाग-सांगली



स्थापना ता. १० सप्टेंबर १९४७ रोजीं, इंडियन कंपनीज ॲक्ट १९१३ खालीं रजिस्टर होऊन झाली. १९४८ पासून प्रत्यक्ष उत्पादनास लहान प्रमाणांत सुरुवात झाली व १९५० सालीं मॅनेजिंग एजन्सीमध्यें दोन नवीन पार्टनर्स समाविष्ट करून घेतले, नंतर शेतकी अवजारें, सेन्ट्रिफ्युगल पंप्स् व फूट-व्हॉल्व्हज् यांचे उत्पादनास सुरुवात झाली. प्रथम दरमहा १२ पंप तयार होऊं लागले. सन १९५२-५३ मध्यें बोअरिंगचे हात पंप्स् बनवूं लागले. हळूहळू प्रॉडक्शनमध्यें वाढ होऊन पंप्स् दरमहा २०-२५ व लोखंडी नांगर पांचशें दरवर्षी तयार होऊं लागले.

सन १९५५-५६ मध्यें पुन्हां उत्पादनांत वाढ होऊन सन १९६२ मध्यें व आतांपर्यंत दरमहा १०० ते १२५ निरनिराळया साईजचे सेन्ट्रिफ्युगल पंप्स् झाले. मोटारला जोडण्याकरितां व नांगर सुमारें २००० तयार होऊं लागले. कंपनीनें नवीन प्रॉडक्शन पिलर टाईप ड्रिलिंग मशीन १" कॅपॅसिटीचें तयार केलें असून दरमहा एक मशीन तयार होऊं लागलें आहे. फौन्ड्रीमध्येंहि वाढ होऊन मोठ्या मोठ्या कारखान्यास लागणारे इंजिन स्पेअर पार्टस् व क्वालिटी कास्टिंग्ज पुरविण्यास आरंभ झाला. हल्लीं कारखान्यांत खालीलप्रमाणें माल तयार होऊं लागला आहे.

(१) लोखंडी नांगर, लहान, मध्यम व मोठ्या आकाराचे, दहा, आठ व सहा बैली; फाळ व सुटे भाग, तसेंच उंसाचे शेतीसाठी सरीचा नांगर.

(२) सेन्ट्रिफ्युगल पंपस् १" ते ४" इरिगेशनसाठी, इले मोटार व इंजिनला जोडण्याकरितां.

(३) स्क्रूड व फॅलन्जड फूट-व्हॉल्व्हज्.

(४) बोअरिंगचे हात पंप्स्.

(५) लोखंडी हातरहाट.



**कृषिमंत्र्यांची भेट**

डावीकडून—(१) उपमंत्री बॅ. जी. डी. पाटील (२) शेठ घेवारी (३) कृषिमंत्री ना. बाळासाहेब देसाई (४) ज. मॅनेजर शामराव भिरंगी (५) गुलाबराव पाटील (६) आ. वसंतराव पाटील (७) डी. एम. कुडचीकर (८) रावसाहेब चव्हाण (९) पी. व्ही. ओगले.

(६) पिलर टाईप ड्रिलिंग मशिन १" कॅपॅसिटी.

(७) कास्ट आयर्न स्पेशल क्वालिटी कास्टिंग्ज.

कारखान्यांत हल्लीं ९५ नोकरवर्ग आहे.

ता. २४-३-६३ रोजीं शेतकी मंत्री नामदार बाळासाहेब देसाई, उपमंत्री राजारामबापू पाटील, जी. डी. पाटील व आमदार वसंतराव पाटील, सांगली जिल्ह्याचे कलेक्टर श्री. शिंदे व इतर अधिकारी यांनीं भेट देऊन कारखान्याचें कामकाज पाहून समाधान व्यक्त केलें.

कारखान्याचे जनरल मॅनेजर, श्री. एस. बी. भिरंगी, A. M. I. S. E, M. S. M. A. हे अनुभविक इंजिनीयर असून त्यांना २५ वर्षांचा अनुभव या धंद्यांतील आहे. मॅनेजिंग एजंटस मे. इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कं. असून डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन श्री. विनायकराव शिरगांवकर हे आहेत, व बोर्डामध्यें श्री. केशवराव चौगुले, ॲडव्होकेट, श्री. बाळासाहेब कोरे, वकील यांचा समावेश आहे.

### साखरेचें उत्पादन वाढविण्यासाठी परवाने

साखरेच्या उत्पादनांत वाढ व्हावी म्हणून नवीन कारखान्यांस परवाने देण्याचें भारत सरकारनें ठरविलें आहे. तदनुसार नवीन कारखाने काढण्यासाठी व सध्यांच्या कारखान्यांचा विकास करण्यासाठी राज्य सरकारांनीं शिफारस केलेल्या शिलकी अर्जांचा विचार करण्याचें काम हातीं घेण्यांत येत आहे. यासाठी संबंधित खात्यांच्या प्रतिनिधींची एक समिति स्थापण्यांत आली आहे. पुढील दोन-तीन वर्षांत आणखी ५ लाख टन साखरेचें उत्पादन व्हावें हा यामागील हेतु आहे. सदर समिति हें काम तीन महिन्यांत पूर्ण करण्याची अपेक्षा आहे.

### बोइंग विमानाला लागणाऱ्या टायर्स

बोइंग विमानांना लागणाऱ्या टायर्स भारतांत तयार करण्याचे प्रयत्न चालू आहेत. कलकत्ता येथील डनलॉप रबर कारखान्यानें तयार केलेल्या कांहीं टायर्स चांचाणीसाठी लंडनला पाठविण्यांत आल्या आहेत. बोइंग विमान जड असल्यामुळें त्याच्या टायर्स विशेष मजबूत असाव्या लागतात. शिवाय त्याचा उतरण्याचा वेगहि फार असल्यानें उतरतांना टायर्सवर चांगलाच ताण पडतो.

### हिंदुस्थान मशीन टूल्सला २·१५ कोटी रुपये निव्वळ नफा

हिंदुस्थान मशीन टूल्सला १९६२-६३ मध्यें २·१५ कोटी रुपये निव्वळ नफा झाला. १० टक्के डिव्हिडंड जाहीर केला. सदर कारखान्यास झालेला हा निव्वळ नफा ६·५६ कोटी रुपये भागभांडवलावरील ३३ टक्के उत्पन्न होय. मागील वर्षाचा हा आंकडा २४ टक्के होता. या कारखान्यानें जाहीर केलेला १० टक्के डिव्हिडंड हा सरकारी क्षेत्रांतील कारखान्यांत लागोपाठ तिसऱ्या वर्षी देऊं केलेला सर्वांत जास्त डिव्हिडंड होय.

### साखरकारखाने बंद पडण्याचा संभव

उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागांतील १२ साखर कारखाने ह्या वर्षी बंद करण्यांत येण्याचा संभव आहे. दोन कारखान्यांनीं राज्य सरकारला तशी सूचनाहि दिली आहे. सरकारनें ठरवून दिलेली साखरेची किंमत परवडण्यासारखी नसल्यानें साखरकारखान्यांना कारखाने बंद ठेवावे लागतील असें कारण सांगण्यांत येत आहे. कानपूरमधील साखरव्यापाऱ्यांच्या संघटनेनें साखरेच्या किंमतीवरील नियंत्रणें रद्द करण्याची मागणी केली आहे.

## नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन
### श्री. शामराव कदम

मराठवाड्याच्या परिसरांत सामाजिक, शैक्षणिक, राजकीय व सहकारी क्षेत्रांत प्रकर्षानें ज्या व्यक्तींचा उल्लेख केला जात आहे



त्यांत नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे विद्यमान चेअरमन श्री. शामराव कदम यांचें नांव प्रामुख्यानें घेतलें जातें. त्यांचा जन्म फसली १३३१ म्हणजे इ. स. १९२१ सालांत नांदेड तालुक्यांतील लिंबगांव या लहानशा खेड्यांत झाला. पिढीजाद पाटीलकीचें वतन यांचे घराण्याकडे असून शेती हा वडिलोपार्जित प्रमुख धंदा. शामरावजींनी प्राथमिक शिक्षणाचा श्रीगणेशा नांदेड येथें घेतला व माध्यमिक शिक्षणाचा कित्ताहि सरकारी म. प. विद्यालयांत नांदेड येथें गिरविला. हें शिक्षण पुरें झाल्यावर कायद्याचा अभ्यास व त्या विषयाची पदवी त्यांनीं हैद्राबाद येथें संपादन केली.

श्री शारदा भुवन शिक्षणसंस्थेचे ते उपाध्यक्ष आहेत. नांदेड येथें शिक्षणाचें पवित्र कार्य करीत असलेली ही आदर्श शिक्षण संस्था त्यांच्या अविश्रांत श्रमानेंच भरभराटीस आलेली आहे. खेड्यापाड्यांतून दूरवर येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची चांगली सोय व्हावी, त्यांना शांत चित्तानें नीट विद्यार्जन करतां यावें, म्हणून या संस्थेला नूतन मराठा छात्रालय नांवाचें वसतिगृह जोडलें आहे. विद्यार्थ्यांनीं गजबजलेल्या ह्या छात्रालयाचे ते आजीव व आद्य सदस्य आहेत. लोकांच्या शैक्षणिक आकांक्षा वाढल्यामुळें नांदेडला असलेलें एक महाविद्यालय अपुरें वाटल्यामुळें यशवंत महाविद्यालयाची कल्पना निघाली, व ती कल्पना मूर्त स्वरूपांत येऊन तीन महिन्यांत महाविद्यालयाच्या इमारतीचें काम पुरें होऊन त्या जागेंत जूनमध्यें कॉलेज सुरू झालें. याचें सर्व श्रेय श्री. शामरावजींच्या अविरत श्रमास व संघटनाकौशल्यासच देणें इष्ट आहे.

एक निष्णात वकील म्हणून नांदेडचे बारमध्यें त्यांची गणना झालेली होती. इ. स. १९५९ सालपर्यंत, म्हणजे जवळजवळ बारा-तेरा वर्षें, त्यांनीं या व्यवसायांत घालवून चांगला नांवलौकिक कमविला. या काळांतच त्यांच्या सार्वजनिक जीवनास सुरुवात झाली. मात्र १९५९ नंतर धंद्याव्यतिरिक्त इतर संस्थांचा व्याप त्यांच्या मागें इतका वाढला कीं, त्यांना वकिलीच्या व्यवसायाला कायमचा रामराम ठोकावा लागला.

१९४७ सालापासूनच विधायक स्वरूपाच्या सार्वजनिक व लोकोपयोगी कार्यांतसुद्धां ते जातीनें लक्ष घालीत असत. इ. स. १९५५ सालीं नांदेड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळांत ते निवडून आले. या मंडळावर असतांना सहकारी पतपेढ्या, त्यांचें कार्य, सहकारी चळवळ व त्याला आनुषंगिक अशा विषयांचा त्यांनीं सखोल अभ्यास केला. तेव्हांपासून त्यांचा सहकारी अर्थशास्त्र हा जिव्हाळ्याचा विषय झाला. सहकारी समाजरचना हें त्यांचें एक रम्य स्वप्न आहे व त्याला मूर्त स्वरूप देणें ही त्यांची तपश्चर्या आहे.

१९५८ सालीं या परिश्रमाचें फळ म्हणूनच कीं काय, नांदेड जिल्हा सहकारी बँकेचे सरकारनियुक्त चेअरमनपदाचा मान त्यांना मिळाला. बँकेच्या जबाबदार कामाचीं सूत्रें त्यांनीं आपल्या हातीं घेतलीं. तेव्हांपासूनच या पांच वर्षांतील बँकेची नेत्रदीपक प्रगति पाहिली कीं, सहकारी क्षेत्रांत त्यांनीं केलेल्या कामाची कल्पना सहज येईल. जेथें ३-४ कर्मचारी व ४ ते ५ लाखांचा व्यवहार होत असे, त्याच बँकेंत आज २०० ते २५० कर्मचारी काम करीत आहेत व दोन कोटी रुपयांचे वर शेतीकर्जाची व अन्य व्यवहाराची उलाढाल अहर्निश होत आहे. प्रत्येक तालुक्याचे गांवीं व तालुक्यांतील इतर मोठाल्या व सोयीच्या गांवीं आज बँकेनें शाखा काढल्या आहेत. ही भरीव प्रगति श्री. शामराव यांच्या कर्तृत्वाची ओळख करून देण्यास पुरेशी आहे. १९५८ सालीं जिल्हा विकास मंडळाच्या उपाध्यक्षपदाची जबाबदारी सरकारनें त्यांच्यावर टाकली. ही मानाची जागाहि त्यांनीं त्यांच्या कार्यक्षमतेनें चांगली भूषविली आहे.

नुसतें वाटतें कर्ज शेतकऱ्याच्या पदरांत टाकून त्यांचें खरें कल्याण होणार नाहीं, तर त्यांच्या शेती-उत्पादनाची योग्य भावांत विक्री करून देणें व त्यांची आर्थिक क्षमता वाढविणें याकरितां सहकारी बाजारपेठेची व्यवस्था अग्रग्यावत् पाहिजे, अशी त्यांची विचारसरणी आहे. म्हणून नांदेड येथें सहकारी खरेदी-विक्री संघाची त्यांनीं १९५९ सप्टेंबरमध्यें स्थापना केली. एक-दीड वर्षाच्या अल्प काळांत खरेदी-विक्री संघानें त्यांच्या देखरेखीखालीं चांगलीच प्रगति केली आहे. नांदेडच्या बाजारपेठेंत त्यांनीं या संस्थेला वैशिष्ट्यपूर्ण स्थान मिळवून दिलें आहे.

कंधार तालुक्यांतील कलंबर विभागांत उसाचें पीक दिवसेंदिवस वाढत आहे. पश्चिम महाराष्ट्राप्रमाणें सहकारी तत्त्वावर इकडेही साखर कारखाना काढावा असें त्यांच्या मनांत आलें. तज्ज्ञांचा योग्य तो सल्ला घेतल्यावर त्या भागांत वारंवार हिंडून जातीनें प्रचाराचें कार्य ते स्वतः करीत आहेत. शेतकऱ्यांना साखरकारखान्याचें महत्त्व त्यांनीं पटवून दिलें आहे. तीन लाखाचे वर भांडवलही त्यांनीं जमविलें आहे. या संघटनेचें आद्य प्रवर्तकही तेच आहेत.

उसापेक्षांही कापूस या भागांत विपुल होतो व सगळा नांदेडचे बाहेर जातो. हातमागाच्या धंद्याला पुरेसा सुताचा पुरवठा होत नाहीं. सहकारी तत्त्वावर स्पिनिंग मिल काढली तर ती अडचण दूर होईल म्हणून त्यांनीं अशी मिल उभारण्याचें योजिलें आहे. या कामाचे प्रमुख प्रवर्तक म्हणून सतत प्रचार व भांडवल गोळा करण्याचे प्रयत्नांची शिकस्त त्यांनीं केली म्हणून आतां ती स्पिनिंग मिल रजिस्टर झाली असून त्याचे शामरावजी हे अध्यक्ष आहेत.

मध्यवर्ती बँकेप्रमाणेंच भूतारण बँकेच्या मंडळाचेहि ते सदस्य होते. ही संस्था चांगली वाढावी म्हणून त्यांनीं बरेच परिश्रम घेतले आहेत. या संस्थेचें कामकाज त्यांनीं बरेंच वाढवून तिच्यांत आमूलाग्र सुधारणा घडवून आणली आहे.

